RNI No. MAHBIL/2009/37831
Reg. No MH/MR/South-339/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार — ब

वर्ष ४, अंक १०३(२)] शनिवार, फेब्रुवारी २, २०१३/माघ १३, शके १९३४ [पृष्ठे ११

किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १३

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### विधी व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ जानेवारी २०१३

### अधिसूचना

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४.

क्रमांक-एसएसव्ही-२०१२/प्र.क्र.३३/का-सोळा.—श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ (२००४ चा महा.१४) यांचे कलम ८ चा खंड (ख), कलम १३ चे पोट-कलम (२) आणि कलम २५ ची पोट-कलमे (१) व (२) आणि पोट-कलम (३) चे परंतुक यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, जीमुळे तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याची खात्री पटल्यानंतर आणि उक्त कलम २५ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकान्वये पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीशिवाय, महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढील नियम करीत आहे:-

१. संक्षिप्त नाव.—या नियमांना, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), ( व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नियुक्ती आणि प्रतिज्ञापत्राचे नमुने ) नियम, २०१३ असे म्हणावे.

२. व्याख्या.—(१) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर -

(क) " अधिनियम " याचा अर्थ, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था(शिर्डी) अधिनियम, २००४ (२००४ चा महा. १४) असा आहे ;

(ख) " समिती " याचा अर्थ, राज्य शासनाने, अधिनियमाच्या कलम ५ अन्वये घटित केलेली श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती, असा आहे ;

(ग) " नमुना " याचा अर्थ, या नियमांना जोडलेला नमुना, असा आहे ;

(घ) " संस्थान विश्वस्तव्यवस्था " याचा अर्थ, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, असा आहे ;

(ङ) " अनुसूची " याचा अर्थ, या नियमांना जोडलेली अनुसूची, असा आहे.

(२) या नियमांमध्ये वापरलेले परंतु यापूर्वी व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमामध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

३. समितीची नेमणूक.—(१) राज्य शासन, अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (२) च्या तरतुदीनुसार, समितीवर सदस्य म्हणून राज्य शासन, पुढील व्यक्तींची नियुक्ती करील:-

(एक) ज्या व्यक्ती, महाराष्ट्र राज्यातील कायमस्वरुपी रहिवाशी आहेत:-

(दोन) ज्या व्यक्ती, श्री साईबाबा यांच्या भक्त आहेत, आणि

(तीन) ज्या व्यक्ती पुढील प्रवर्गातील आहेत:-

| प्रवर्ग | सदस्यांची संख्या |
|---|---|
| (क) महिला | १ पेक्षा कमी नसेल |
| (ख) सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | १ पेक्षा कमी नसेल |
| (ग) अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम(२) च्या अर्थातर्गत व्यावसायिक किंवा विशेषीकृत ज्ञान धारण करणाऱ्या व्यक्ती | ८ पेक्षा कमी नसतील |
| (घ) सर्वसाधारण | ७ पर्यंत: |

परंतु, नियुक्त करावयाच्या सदस्यांची संख्या ही १७ पेक्षा अधिक नसेल (अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्यासह).

(२) वरील प्रवर्ग "ग" मधील व्यक्तींमध्ये, व्यावसायिक किंवा विशेषीकृत ज्ञान, अर्हता यांसह शैक्षणिक पार्श्वभूमी असणाऱ्या आणि पुढीलपैकी एका किंवा त्यापेक्षा अधिक क्षेत्रांमधील प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या आठ पेक्षा कमी नसतील इतक्या व्यक्तींचा अंतर्भाव असेल :—

(एक) विधी ;

(दोन) व्यवसाय व्यवस्थापन, लेखाशास्त्र, अर्थशास्त्र, वित्तव्यवस्था किंवा लोक प्रशासन ;

(तीन) अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र ;

(चार) सार्वजनिक आरोग्य, औषध वैद्यकशास्त्र ;

(पाच) ग्रामीण विकास:

परंतु, समितीमध्ये, वरील अनुक्रमांक (एक) ते (चार) मध्ये नमूद केलेल्या क्षेत्रांपैकी प्रत्येक क्षेत्रातील किमान एका व्यक्तीचा अंतर्भाव असेल आणि वरील अनुक्रमांक (पाच) मध्ये नमूद केलेल्या क्षेत्रातील एका व्यक्तीपेक्षा अधिक व्यक्तींचा अंतर्भाव असणार नाही :

परंतु आणखी असे की, वरील प्रवर्ग "ग" मधून नियुक्त करावयाच्या व्यक्ती ह्या, अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेली किमान अर्हता व अनुभव धारण करतील.

(३) वरील प्रवर्ग "घ" मधील व्यक्तींमध्ये, एकतर जे भक्तमंडळाचे आश्रयदाते किंवा आजीव सदस्य असतील अशा सात पर्यंत असलेल्या व्यक्तींचा अंतर्भाव असेल :

परंतु, प्रवर्ग "ड." मधून नियुक्त्या करतेवेळी, पुढीलपैकी सर्व किंवा त्यापैकी कोणतेही घटक विचारात घेण्यात येतील :—

(एक) स्नातक पदवी धारण करणे ;

(दोन) शिर्डीतील किंवा अहमदनगर जिल्ह्यातील रहिवाशी असणे ;

(तीन) सामाजिक किंवा शैक्षणिक बाबींमध्ये अथवा सामाजिक किंवा शैक्षणिक विकासामध्ये व्यक्तीने दिलेले योगदान ;

(चार) शिर्डीचे प्रतिनिधित्व करणारा संसद सदस्य अथवा शिर्डी विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारा राज्य विधानमंडळाचा सदस्य असणे.

४. सदस्य असण्यासाठी अर्हता.— (१) संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कार्यासाठी, एका कॅलेंडर महिन्यात किमान दोन दिवस उपस्थित राहू शकेल अशी व्यक्तीच केवळ समितीचा सदस्य म्हणून नियुक्ती केली जाण्यास पात्र असेल.

(२) समितीचा सदस्य म्हणून नियुक्त केल्या जाणाऱ्या व्यक्तीचे, वय नामनिर्देशनाच्या दिनांकास किमान २५ वर्षे असले पाहिजे आणि ७० वर्षांपेक्षा अधिक असता कामा नये.

५. सदस्यत्वाकरिता अनर्हता.— पुढील व्यक्ती ह्या, समितीचा सदस्य म्हणून नियुक्त होण्यास अनर्ह ठरतील :—

(क) अज्ञान ;

(ख) विकल मनाची, आणि सक्षम न्यायालयाने तसे घोषित केलेली व्यक्ती ;

(ग) अमुक्त नादार ;

(घ) संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या स्थावर मालमत्तेच्या संबंधातील पट्टा अथवा अन्य कोणताही व्यवहार यांमध्ये प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणताही हितसंबंध असलेली व्यक्ती ;

(ङ) संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधातील मालाच्या पुरवठ्याबाबतच्या अथवा समितीने हाती घेतलेल्या कोणत्याही कामाबाबतच्या किंवा सेवा पार पाडण्याबाबतच्या कोणत्याही संविदेमध्ये जिचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणताही हिस्सा अथवा हितसंबंध असेल अशी व्यक्ती ;

(च) जी गैरवर्तणुकीबद्दल दोषी ठरली असेल किंवा नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असलेल्या एखाद्या अपराधाबद्दल जिच्यावर दोषारोपपत्र ठेवण्यात आले असेल किंवा अन्यथा जी अयोग्य असल्याचे आढळून आले असेल अशी व्यक्ती ;

(छ) लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ (१९५१ चा ४३) याच्या कलम ८ च्या पोट-कलम (२) व (३) अन्वये जी अनर्ह ठरली असेल अशी व्यक्ती ;

(ज) जी समितीची सदस्य होती, परंतु अनुपस्थितीच्या परवानगीशिवाय जी समितीच्या लागोपाठ तीन बैठकींना अनुपस्थित राहिली होती आणि अधिनियमाच्या कलम ७ (३) द्वारे तरतूद केल्याप्रमाणे जिने पद सोडलेले असेल अशी व्यक्ती.

६. सदस्यांची नियुक्ती.— राज्य शासन नामनिर्देशनाद्वारे सदस्यांची नियुक्ती करील :

परंतु, पुढील बाबींची पूर्तता केल्यानंतरच अशी नियुक्ती केली जाईल :—

(एक) सदस्य म्हणून नियुक्त केल्या जाणाऱ्या व्यक्तीने या नियमांना जोडलेल्या "नमुना-क" मधील प्रतिज्ञापत्र सादर करणे ; आणि

(दोन) नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असणाऱ्या अपराधाबद्दल सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायालयाने अशा व्यक्तीला दोषी ठरवलेले नाही किंवा तिच्यावर दोषारोपपत्र ठेवलेले नाही किंवा अन्यथा ती अयोग्य असल्याचे आढळून आलेले नाही, असे प्रमाणित करणारा पोलीस अहवाल किंवा पोलीस पडताळणी अहवाल राज्य शासनाला प्राप्त होणे.

७. समितीचा कार्यकाल.— समितीचा सदस्य राजपत्रात त्याची नियुक्ती अधिसूचित केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीकरिता पद धारण करील :

परंतु, एखाद्या सदस्याची ज्या कोणत्याही पदाच्या आधारे अथवा संसद सदस्य किंवा शिर्डी विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारा राज्य विधानमंडळाचा सदस्य याच्या आधारे नियुक्ती करण्यात आली असेल असा सदस्य, ते पद धारण करण्याचे बंद होईल अथवा संसद सदस्य किंवा, यथास्थिति, राज्य विधानमंडळाचा सदस्य असण्याचे बंद होईल तेव्हा किंवा त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यावर यापैकी जे अगोदर घडेल तेव्हापासून समितीचा सदस्य म्हणून पद सोडील :

परंतु आणखी असे की, राज्य शासनास, राजपत्रातील आदेशाद्वारे आणि कारणे लेखी नोंदवून समितीच्या सदस्याचा पदावधी तीन वर्षांच्या उक्त कालावधीहून आणखी वाढविता येईल, जो एकूण सहा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही.

८. नैमित्तिक रिक्त पद भरणे :- एखाद्या सदस्याचा मृत्यू, राजीनामा, त्याला पदावरून काढून टाकणे किंवा तो अनर्ह ठरणे अथवा अन्य एखाद्या कारणाने कोणतेही पद नैमित्तिक रिक्त झाल्यास, राज्य शासनाकडून ते पद शक्य तितक्या लवकर भरण्यात येईल आणि त्या रिक्त पदावर निवड केलेली व्यक्ती, ज्या व्यक्तीच्या जागी तिची नियुक्ती झालेली असेल त्या व्यक्तीच्या उर्वरित पदावधीकरिता ते पद धारण करील :

परंतु, राज्य शासन रिक्त पदावर नियुक्ती करताना नेहमीच अधिनियमाच्या तरतुदींचे व या नियमांचे अनुपालन करील.

९. अधिनियमाच्या कलम ८ व कलम १३ (२) अन्वये प्रतिज्ञापन :— (१) समितीचा सदस्य म्हणून नियुक्ती केली जाणारी व्यक्ती, तिच्या नियुक्तीपूर्वी, अधिनियमाच्या कलम ८ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, नमुना "ख" मध्ये प्रतिज्ञापन देईल.

(२) कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त केला जाणारा अधिकारी, अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, नमुना "ग" मध्ये प्रतिज्ञापन देईल.

अनुसूची

[ नियम ३ (३) पहा ]

| अ.क्र. (१) | प्रवर्ग (२) | किमान अर्हता व अनुभव (३) |
|---|---|---|
| १ | विधी | विधीमधील पदवी (एलएलबी) धारण केलेली असावी आणि महाराष्ट्र व गोवा वकील परिषदेकडे किमान दहा वर्षांकरिता अधिवक्ता म्हणून नोंदणी केलेली असावी आणि जिल्हा न्यायाधीश किंवा प्रबंधक, उच्च न्यायालय यांनी दिलेले वकील व्यवसाय प्रमाणपत्र धारण केलेली असावे. |
| २ | व्यवसाय व्यवस्थापन किंवा लेखाशास्त्र किंवा वित्तव्यवस्था | व्यवसाय प्रशासनामधील पदवी (बीबीए) किंवा अन्य समतुल्य पदवी व्यवस्थापकीय पदावरील किमान दहा वर्षांचा अनुभव धारण केलेली असावी किंवा भारतीय सनदी लेखापाल संस्थेकडे किमान दहा वर्षांच्या कालावधीकरिता सनदी लेखापाल म्हणून नोंदणी केलेली असावी किंवा अर्थशास्त्र अथवा वित्तव्यवस्था यांमधील पदवी धारण केलेली असावी. |
| | किंवा लोक प्रशासन | किंवा लोक प्रशासनामधील पदवी आणि किमान दहा वर्षांचा अनुभव धारण केलेली असावी किंवा उप जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल अशा पदावरून सेवानिवृत्त झालेली व्यक्ती असावी. |
| ३ | अभियांत्रिकी | मान्यता प्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकीमधील पदवी (बी.ई.) आणि अभियांत्रिकी उपक्रमांमधील किमान दहा वर्षांचा अनुभव धारण केलेली असावी. |
| | किंवा वास्तुशास्त्र | किंवा वास्तुशास्त्रामधील पदवी (बी.आर्क.) आणि किमान दहा वर्षांचा व्यवसाय केलेली असावी. |
| ४ | सार्वजनिक आरोग्य किंवा औषध वैद्यकशास्त्र | एम.बी.बी.एस. / बी.ए.एम.एस. / बी.यु.एम.एस. / बी.एच.एम.एस. पदवी धारण करणारी आणि रुग्णालय प्रशासन किंवा आरोग्य संस्था यांमधील किमान दहा वर्षांचा अनुभव असलेली वैद्यक व्यवसायी. |
| ५ | ग्रामीण विकास | कोणत्याही ज्ञानशाखेतील पदवीधर असावी आणि ग्रामीण क्षेत्रांच्या विकासामधील किमान दहा वर्षांचा अनुभव आणि प्राविण्य मिळवलेले असावे, तसेच राज्य किंवा केंद्र सरकारने त्यास मान्यता दिलेली असावी. |

नमुना-क

( नियम ६ व कलम ८ पहा )

सदस्य म्हणून नियुक्ती करण्याकरिता द्यावयाचे शपथपत्र.

| अभिसाक्षीचे पासपोर्ट आकारातील अलीकडचे छायाचित्र |
|---|

मी, ..........................................................(नाव). ...............................................................................

(पत्ता) ...................................................................... (वय) याद्वारे, गांभीर्यपूर्वक अशी प्रतिज्ञा करतो की,

(१) मी, महाराष्ट्र राज्याचा कायम रहिवाशी आहे;

(२) मी, शिर्डीचे श्री साईबाबा यांचा भक्त आहे आणि शिर्डीच्या श्री साईबाबांची शिकवण व तत्त्वे यांवर विश्वास ठेवतो;

(३) मला संस्थानाची ध्येये व उद्दिष्टे मान्य आहेत;

(४) मी, संस्थानाचे नियम व विनियम वाचूले असून त्यांचे पालन करण्याचे मी मान्य करतो;

(५) मी, संस्थानाच्या हितास बाधक किंवा हानीकारक होतील अशी कोणतीही कामे करणार नाही;

(६) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ (सन २००४ चा महा.१४) याच्या कलम ९ किंवा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (व्यवस्थापन समितीचा सदस्यांची नियुक्ती आणि प्रतिज्ञापत्राचे नमुने) नियम, २०१३ नुसार कोणत्याही बाबतीत मी अर्नह ठरलेलो नाही;

(७) दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाची शिक्षा होईल अशा अपराधासाठी किंवा नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असेल अशा अपराधासाठी, सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायालयाने मला यापूर्वी कोणत्याही वेळी दोषी ठरवलेले नाही किंवा माझ्यावर दोषारोपपत्र दाखल केलेले नाही;

(८) मी, प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या किमान दोन दिवशी संस्थानाच्या कार्यांमध्ये उपस्थित राहीन, हे मान्य करतो व तसे वचन देतो.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती होण्याकरिता मी हे शपथपत्र दाखल करीत आहे.

दिनांक :-

ठिकाण :-

( अभिसाक्षीची सही )

उपरोक्त परिच्छेद- (१) ते (८) यामध्ये दिलेली माहिती माझ्या ज्ञानाप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी व अचूक आहे, याची पडताळणी केलेली आहे.

याकरिता सत्यापित करण्यात येते.

माझ्या समक्ष

( अभिसाक्षी )

नमुना-ख

[ नियम ९ (१) पहा ]

( कलम ८ खालील प्रतिज्ञापन )

दिनांक : / /२०

प्रति,

प्रधान सचिव,
विधी व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

विषय.—श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम,२००४ याच्या कलम ८ अनुसार व्यवस्थापन समितीच्या सदस्याचे प्रतिज्ञापन.

महोदय,

मी, ............................................................................................(नाव) याद्वारे, घोषित करतो की,

(१) मी, महाराष्ट्र राज्याचा कायम रहिवाशी आहे;

(२) मी, शिर्डीचे श्री साईबाबा यांचा भक्त आहे आणि शिर्डीच्या श्री साईबाबांची शिकवण व तत्त्वे यांवर विश्वास ठेवतो;

(३) मला संस्थानाची ध्येये व उद्दिष्टे मान्य आहेत;

(४) मी, संस्थानाचे नियम व विनियम वाचले असून त्यांचे पालन करण्याचे मी मान्य करतो;

(५) मी, संस्थानाच्या हितास बाधक किंवा हानीकारक होतील अशी कोणतीही कामे करणार नाही.

वैयक्तिक माहिती

| | | |
|---|---|---|
| (१) | पूर्ण नाव : | ............... ................... ................<br>(आडनाव) (पहिले नाव) (मधले नाव) |
| (२) | जन्मदिनांक : | |
| (३) | वय : | |
| (४) | शैक्षणिक अर्हता | : |
| (५) | धंदा / व्यवसाय | : |
| (६) | इतर कार्ये :— | (समाजकार्य इत्यादी) |
| (७) | कायमचा पत्ता | : |
| (८) | सध्याचा पत्ता | : |
| (९) | दूरध्वनी क्रमांक | : कार्यालय ..................... निवास ...................... |
| (१०) | भ्रमणध्वनी क्रमांक | : |
| (११) | फॅक्स क्रमांक | : |
| (१२) | ई-मेल : | |

सदस्याची सही.

४४

नमुना-ग

[ नियम ९ (२) पहा ]

[अधिनियमाच्या कलम १३ (२) खालील प्रतिज्ञापन ]

दिनांक :......../ ........ /२०........

प्रति,

प्रधान सचिव,
विधी व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

विषय.—श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम,२००४ याच्या कलम १३ (२) अनुसार कार्यकारी अधिकाऱ्याचे प्रतिज्ञापन.

माननीय महोदय,

मी,..............................................................................(नाव) याद्वारे, असे घोषित करतो की,

(१) मी, महाराष्ट्र शासनाच्या ................. विभागामध्ये.................(पदनाम) या पदावर कार्यरत आहे;

(२) मी, शिर्डीचे श्री साईबाबा यांचा भक्त आहे आणि शिर्डीच्या श्री साईबाबांची शिकवण व तत्त्वे यांवर विश्वास ठेवतो;

(३) मला संस्थानाची ध्येये व उद्दिष्टे मान्य आहेत;

(४) मी, संस्थानाचे नियम व विनियम वाचले असून त्यांचे पालन करण्याचे मी मान्य करतो;

(५) मी, संस्थानाच्या हितास बाधक किंवा हानीकारक होतील अशी कोणतीही कामे करणार नाही.

वैयक्तिक माहिती ११

................ ................ ................

(१) पूर्ण नाव : (आडनाव) (पहिले नाव) (मधले नाव)

(२) जन्मदिनांक :

(३) वय :

(४) शैक्षणिक अर्हता :

(५) धंदा / व्यवसाय :

(६) कायमचा पत्ता :

(७) सध्याचा पत्ता :

(८) दूरध्वनी क्रमांक : कार्यालय ................ निवास ................

(९) भ्रमणध्वनी क्रमांक :

(१०) फॅक्स क्रमांक :

(११) ई-मेल :

(अधिका-याची सही)

महाराष्ट्रांचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विजय अचालिया,
प्रधान सचिव आणि विधी परामर्शी,
विधी व न्याय विभाग.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.